# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

**YEAR : 38)** **15th April 2013 (No. of Pages 8)** **( No : 05**


**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

***( MFUCTO )***

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी जळगांव येथील बैठकीत सम्मत झालेला ठराव

**१.१** देशाच्या मा. कृषीमंत्र्यांनी स्वतः याबाबतीत वेळ काढून व लक्ष घालुन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री डॉ. एम्. पल्लम राजू यांना आपल्या निवासस्थानी चर्चेसाठी निमंत्रित केले. ही जी बैठक झाली त्या बैठकीचे चित्रवाहिन्यावर आलेले वृत्त व या बैठकीचे अधिकृतपणे प्रसारित करण्यात आलेले वृत्तपत्रीय प्रसारण यांचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास पुढील बाबी ठळकपणे समोर येतात. :-

(१) थकबाकी अदा करण्याबाबतचा केंद्र शासनाचा १४ ऑगस्ट २०१२ चा जो शासननिर्णय आहे तो केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयावर आधारित असल्यामुळे त्यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

(२) १४ ऑगस्टच्या शासननिर्णयाप्रमाणे प्रथम राज्य शासनाने थकबाकी अदा करावयाची असून त्यापैकी ८० टक्के रक्कम परताव्याच्या स्वरुपात केंद्र शासनाकडून अदा केली जाईल. **राज्यशासनाने निधी अदा केल्यावर ८० टक्के केंद्राची मदत जारी केली जाईल.** असे या अधिकृत वृत्तपत्रीय प्रसारणामध्ये स्पष्टपणे नमूद आहे.

**१.२** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी "सर्व थकबाकी एकमुस्त दिली तरच केंद्राकडून परतावा मिळेल हे स्पष्ट दिसते. **केंद्र सरकारची आर्थिक परिस्थिती ही काही फार चांगली नाही त्यामुळे त्यांच्याकडून वेळेवर परताव्याचा निधी मिळेल असे सांगता येत नाही**" असे उद्‌गार काढले होते. या बैठकीचे जे शासकीय कार्यवृत्त संघटनेकडे पाठविण्यात आले आहे त्या कार्यवृत्तातसुद्धा "दि. १४.०८.२०१२ च्या पत्रान्वये मात्र वरील ८० टक्के रक्कम प्रथम राज्य शासनाने अदा करावी. त्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती २ ते ३ हप्त्यामध्ये राज्य शासनास करण्यात येईल असे कळविले आहे. **सदर २ ते ३ हप्त्यातील रक्कम किती कालावधीत राज्य शासनास अदा करण्यात येईल, त्याबाबत केंद्र शासनाच्या पत्रात कोणतेही भाष्य केले नाही.**" असा स्पष्ट उल्लेख आहे. या कार्यवृत्तात असेही नमूद आहे की " केंद्र शासनाने दि. १४.११.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांना केंद्र शासनाच्या ८० टक्के हिस्स्याची रक्कम अदा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे."

**१.३** मा. केंद्रीय कृषीमंत्र्यांनी आयोजित केलेल्या या उपरोक्त बैठकीनंतर राज्य शासनाने आता केंद्र शासनावर गैरभरवसा दाखविण्याचे कोणतेही कारण शिल्लक उरलेले नाही. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्राने ८० टक्के रक्कम दिली नाही असे यापूर्वी कधीही घडलेले नाही. "केंद्र शासनावर गैरभरवसा करणाऱ्या थकबाकी अदा करण्याच्या कोणत्याही व्यवस्थेवर भरवसा ठेवण्यास दृढ नकार देण्याचा निर्धार हे कार्यकारी मंडळ व्यक्त करीत आहे." असा ठराव या कार्यकारी मंडळाने यापूर्वीच सम्मत केला असून तसे यापूर्वी राज्यशासनाला कळविण्यात आले आहे. **ज्येष्ठ अशा उभय दोन मा. केंद्रीय मंत्र्यांच्या या बैठकीनंतर राज्य शासनातर्फे संघटनेला याबाबतीत आजपावेतो राज्य शासनाचा निर्णय म्हणून काहीही कळविण्यात आलेले नाही हे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे.**

**२.१** "**प्राध्यापकांसाठी नेटसेट पात्रता हा विषय संवेदनशील असून अधिकारी स्तरावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करू**" असे मंत्रिमहोदयांनी नमूद केल्याचा उल्लेख मा. उभय केंद्रीय मंत्र्यांच्या बैठकीनंतर काढण्यात आलेल्या वृत्तपत्रीय प्रसारणामध्ये नमूद आहे. "राज्यातर्फे उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. संजयकुमार, तर मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव श्री. अशोक

***मा. केंद्रीय कृषीमंत्र्यांनी आयोजित केलेल्या या उपरोक्त बैठकीनंतर राज्य शासनाने आता केंद्र शासनावर गैरभरवसा दाखविण्याचे कोणतेही कारण शिल्लक उरलेले नाही. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्राने ८० टक्के रक्कम दिली नाही असे यापूर्वी कधीही घडलेले नाही.***

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद १.३ पहा*

**ज्येष्ठ अशा उभय दोन मा. केंद्रीय मंत्र्यांच्या या बैठकीनंतर राज्य शासनातर्फे संघटनेला याबाबतीत आजपावेतो राज्य शासनाचा निर्णय म्हणून काहीही कळविण्यात आलेले नाही हे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे.**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद १.३ पहा*

ठाकूर बैठकीत सहभागी होते." असेहि या अधिकृत वृत्तपत्रीय प्रसारणामध्ये नमूद आहे. केंद्र शासनामध्ये अधिकाऱ्यांच्या स्तरावर आता याबाबत काही कारवाई शिल्लक उरलेली आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटत नाही.

**२.२** महाराष्ट्रातून हे प्रकरण दिल्लीमध्ये गेल्यानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने तत्कालीन मानव संसाधन मंत्री श्री. कपिल सिब्बल यांची भेट घेतली होती. नेटसेटची पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लागू केली जात आहे हे ऐकून कपिल सिब्बल यांना आश्चर्य वाटले व "असे करता येत नाही" असे स्पष्ट उद्‌गार त्यांनी काढले. नुसते उद्‌गार काढून ते थांबले नाहीत तर त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला तसे कळविण्याविषयी विभागातील अधिकाऱ्यांना आदेश दिले. केंद्र शासनाच्या Ministry of Human Resource Development Department of Higher Education या विभागाच्या "D.O.No. B-7/2010-U.I Dated the 3rd November, 2010" अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाला एक पत्र पाठवून "these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective dates." असे कळविले होते.

**२.३** ही बाब एवढ्यावरच थांबली नाही तर दिनांक ८ जुलै २०११ रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ४७९ व्या बैठकीमध्ये या विषयावर भारतात असे हे एकमेव प्रकरण असल्यामुळे फक्त महाराष्ट्रापूरता निर्णय झाला. त्या बैठकीला मानव संसाधन मंत्रालयातील संचालक श्री. आर.डी.सहाय हे विशेषत्वाने उपस्थित होते, असे त्या बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद आहे. त्या दिवशीच्या बैठकीतील निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्यशासनाला कळविले. राज्याच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी मा. मुख्यमंत्र्यांना तो निर्णय पुढील शब्दात सांगितला :- "दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल, २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निर्देश विचारात घेवून सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत."

**२.४** उपरोक्त दोनही प्रश्नांच्या बाबतीत केंद्र शासनाच्या पातळीवर कोणतीही बाब आता 'पेंडीग' राहिलेली नाही. ज्येष्ठ नेते व केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरदराव पवार व केंद्रीय मानव संसाधन मंत्री श्री. एम्. पल्लम राजू यांनी उपरोक्त बैठक घेवून **या दोनही प्रश्नांना जी गती दिली त्याबद्दल मनापासून आभार व्यक्त करीत असतांना त्या बैठकीनंतर महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर झालेला (झाला असल्यास) कोणताही निर्णय संघटनेला कळविण्यात आलेला नाही हे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे.**

**३.१** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने संघटनेला ७ मार्च २०१३ रोजीच्या पत्रान्वये नेटसेट बाबतचा जो निर्णय कळविला आहे. तो शब्दशः पुढील प्रमाणे आहे. :-

**"दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा विर्निदिष्ट अटींच्या अधिन राहून शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे."**

**३.२** हा परिच्छेद काळजीपूर्वक वाचला तर त्यातील एका वाक्यात "दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा ..... सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे." असे नमूद असून दुसरे वाक्य या "अध्यापकांच्या सेवा विनिर्दिष्ट अटींच्या अधिन राहून शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे." अशा शब्दरचनेचे आहे. सन २०१३ मध्ये निघणारा शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सेवा धरावयाची असा जो निर्णय झाला आहे त्याप्रमाणे "दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२०००" या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांची सेवा कशी काय धरली जाईल? कालगणनेमध्ये एखादा शासननिर्णय काढून सन १९९१ ते २००० चा कालखंड हा सन २०१३ नंतर आणून उभा करता येईल काय? व त्याप्रमाणे सेवा नियमित केल्याची गणना कशी करता येईल? परस्पराच्या विरुद्ध असलेली ही दोन वाक्ये शासननिर्णयात एकमेकाला खेटून बसल्याने कालगणनेचे चक्र उलटे कसे फिरवीता येईल?

**३.३** अगदी उघड सांगायचे तर उपरोक्त वाक्यरचना ही अर्थालंकारातील व्याघात अलंकाराचे प्रतिनिधीत्व करणारी आहे. नागपूर विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे माजी विभाग प्रमुख व ज्येष्ठ साहित्यीक दिवंगत श्री.ग.त्र्यं.देशपांडे प्रमुख लेखक असलेल्या 'अलंकार प्रदिप' या ग्रंथामध्ये व्याघात अलंकाराची उदाहरणे देताना "एक गृहस्थ आपली ओळख सांगतांना म्हणाला "मी जन्मभर मौनव्रत पाळतो; माझा पिता ब्रम्हचारी होता; माता वांझ होती; आणि आजा निपुत्रिक वारला." असे पहिलेच उदाहरण नमूद केले आहे. उपरोक्त ठिकाणी दुसरे उदाहरण म्हणून शोभून दिसेल अशी ही नेटसेटबाबतची वाक्य रचना आहे.

**३.४** या सर्व शिक्षकांची सेवा १२ ते २१ वर्षे झालेली असून त्यांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी साठी सेवा धरण्याचा एक लाभ सोडला तर इतर सर्व लाभ नेमणुकीच्या दिनांकापासून आज अस्तित्वात असलेल्या कायद्याने, परिनियमांनी

**''केंद्र शासनावर गैरभरवसा करणाऱ्या थकबाकी अदा करण्याच्या कोणत्याही व्यवस्थेवर भरवसा ठेवण्यास दृढ नकार देण्याचा निर्धार हे कार्यकारी मंडळ व्यक्त करीत आहे.'' असा ठराव या कार्यकारी मंडळाने यापूर्वीच सम्मत केला असून तसे यापूर्वी राज्यशासनाला कळविण्यात आले आहे.**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद १.३ पहा*

**''प्राध्यापकांसाठी नेटसेट पात्रता हा विषय संवेदनशील असून अधिकारी स्तरावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करू'' असे मंत्रिमहोदयांनी नमूद केल्याचा उल्लेख मा. उभय केंद्रीय मंत्र्यांच्या बैठकीनंतर काढण्यात आलेल्या वृत्तपत्रीय प्रसारणामध्ये नमूद आहे.**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद २.१ पहा*

व शासननिर्णयांनी उपलब्ध झालेले आहेत व मिळत आहेत. वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी सुद्धा त्यांची सेवा धरली जावी असे केंद्र शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय व खुद्द महाराष्ट्र शासनाचे जिवंत शासननिर्णय असतांना महाराष्ट्रातच फक्त ही सेवा धरली जात नाही. याबद्दल आंदोलन सुरू असतांना सर्व प्रयोजनासाठी त्यांची सेवा 'उद्या'पासून धरण्याची जी शब्दरचना नोकरशाहीने रचित केली आहे, ती अचंबित करणारी आहे.

**४.** अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार व परिनियमानुसार हे सर्व शिक्षक सेवेत कन्फर्म झालेले आहेत. या प्रत्येक शिक्षकांची सेवा सर्व प्रयोजनासाठी २०१३ पासून धरावयाची तर त्याचे काय परिणाम होतील व या प्रत्येक परिणामातून त्या शिक्षकांच्या सेवाशर्तीवर तो व तसा आघात करण्याचा घटनेने व कायद्याने आपल्याला अधिकार दिलेला आहे काय? याचा विचार करण्यासाठी सुद्धा कोणालाच वेळ नाही असे दिसून येते. एकएका बाबीचा विचार करू.

(१) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या प्रत्येक शिक्षकाची सेवा **वार्षिक वेतनवाढ अदा करण्याच्या प्रयोजनासाठी** सेवेच्या पहिल्या वर्षापासून यापूर्वीच धरण्यात आली असून त्या प्रत्येकाला या सर्व (१२ ते २१) वार्षिक वेतनवाढी आज नियमानुसार मिळालेल्या आहेत, मिळत आहेत. आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे त्याची सेवा सन २०१३ पासून धरली जाईल, म्हणजे पहिली वार्षिक वेतनवाढ त्या प्रत्येकाला २०१४ मध्ये मिळेल. त्याच्या एवढ्या वेतनवाढी कापून घ्यावयाच्या असतील तर कायद्याप्रमाणे त्या प्रत्येक शिक्षकाला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुमची नेमणूक जरी कायद्याला व नियमांना धरून झाली असली तरी आम्ही आता कापावयाचे ठरविले आहे." असे करतांना "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉज मध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना यथोचित निर्णय घ्यावा लागेल.

(२) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या प्रत्येक शिक्षकांची सेवा सेवानिवृत्ती वेतनासाठी सेवेच्या पहिल्या वर्षापासून धरण्यात येते. तशी ती धरून त्यापैकी निवृत्त झालेल्या अनेकांना **निवृत्ती वेतनाचे लाभ** नियमानुसार मिळत आहेत. आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे त्यांची नेमणूक २०१३ मध्ये झालेली आहे असे धरावे लागेल. नियमाप्रमाणे चालू असलेली शेकडो शिक्षकांची जीपीएफची खाती बंद करावी लागतील. अनेकांची निवृत्ती वेतने परत घ्यावी लागतील तसे करायचे तर त्या प्रत्येक शिक्षकाला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुमची नेमणूक जरी कायद्याला व नियमांना धरून २००५ पूर्वी झाली असली तरी फक्त तुमच्यासारख्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना नव्या पेन्शन योजनेत ढकलण्याचे आम्ही ठरविले आहे." असे करतांना "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉज मध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना निर्णय घ्यावा लागेल.

(३) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या प्रत्येक शिक्षकांची विधिनियमांनी व परिनियमांनी रचीत केलेल्या **निवडसमिती मार्फत निवड** झालेली आहे. निवडसमितीवर शासनाचे व विद्यापीठाचे प्रतिनिधी होते. त्या निवडसमितीने **"हा निवड झालेला प्रत्येक उमेदवार विधिमय पात्रता धारक आहे"** असे आपल्या अहवालात प्रमाणित केलेले आहे. २० वर्षापूर्वीचा कायदेशीर निवडसमितीचा अहवाल बेकायदेशिरपणे रद्द करावा लागेल व आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे निवडसमिती शिवाय निवड करता येणार नाही असा कायदा अस्तित्वात असतांना, सन २०१३ मध्ये निवडसमिती शिवाय या नेमणुका नव्याने करण्याचे बेकायदेशीर कृत्य पार पाडावे लागेल. प्रत्येक शिक्षकाला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुमची नेमणूक झाली तेव्हाची निवडसमिती जरी कायद्याला व नियमांना धरून झाली असली तर आम्ही आता २० वर्षांनी ती निवडसमिती रद्द करण्याचे ठरविले आहे." असे "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉजमध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना निर्णय घ्यावा लागेल.

(४) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या प्रत्येक शिक्षकांच्या नेमणुकीला

**ज्येष्ठ नेते व केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरदराव पवार व केंद्रीय मानव संसाधन मंत्री श्री. एम्. पल्लम राजू यांनी उपरोक्त बैठक घेवून या दोनही प्रश्नांना जी गती दिली त्याबद्दल मनापासून आभार व्यक्त करीत असतांना त्या बैठकीनंतर महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर झालेला (झाला असल्यास) कोणताही निर्णय संघटनेला कळविण्यात आलेला नाही हे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे.**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद २.४ पहा*

कायद्यातील व परिनियमातील तरतुदीप्रमाणे **मा. कुलगुरुंची मान्यता** असावी लागते. तशी कुलगुरुंची मान्यता या प्रत्येक शिक्षकाच्या नेमणुकीला मिळालेली आहे. ती प्रत्येक मान्यता आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे रद्द करावी लागेल. कारण १९९३ मध्ये ज्याला विधिमय अधिकारांचा वापर करून मा. कुलगुरुंनी विधिवत मान्यता प्रदान केली आहे. त्याची नेमणूक २०१३ पासून धरायची ठरल्यास १९९३ मध्ये दिलेली मान्यता रद्द करण्याचे बेकायदेशीर कृत्य पार पाडावेच लागेल. असे कृत्य पार पाडतांना त्या प्रत्येक शिक्षकाला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुमच्या नेमणुकीला असलेली मा. कुलगुरुंची मान्यता कायद्याला व नियमांना धरून झालेली असली तरी आम्ही आता या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे ती रद्द करावयाचे ठरविले आहे." असे "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉजमध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना निर्णय घ्यावा लागेल.

(५) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या प्रत्येक शिक्षकांची सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीमधील स्थाननिश्चितीची एक बाब सोडली तर इतर सर्व प्रयोजनासाठी सेवेच्या पहिल्या वर्षापासून धरण्यात येते. त्यामुळे अशी सेवा धरून त्या सेवेच्या आधारावर अनेक शिक्षकांची यथोचितरित्या निवडसमितीमार्फत **प्राचार्य या पदावर निवड** झाली असून त्या प्रत्येक निवडीला मा. कुलगुरुंनी विधिनियमातील व परिनियमातील तरतुदीनुसार मान्यता प्रदान केलेली आहे. अशा तरतुदीनुसार ते **प्राचार्य या पदावर 'कन्फर्म' झालेले आहेत.** अशा शिक्षकांची/प्राचार्यांची संख्या महाराष्ट्रात ३०० च्या वर आहे. आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे त्या प्रत्येक प्राचार्याला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुमची नेमणूक जरी कायद्याला व नियमांना धरून झाली असली तर आम्ही आता नव्या व्याघाती शासननिर्णयानुसार ती रद्द करावयाचे ठरविले आहे." असे "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉजमध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या प्राचार्याचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना निर्णय घ्यावा लागेल.

(६) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या अंदाजे १० हजार शिक्षकांपैकी अनेकांनी या मधल्या काळात **पी.एचडी. ही पदवी प्राप्त केली.** त्यांची सेवा स्थाननिश्चितीसाठी नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून धरायला हवी होती पण तशी ती धरली नसली तरी पुढच्या एका विशिष्ट तारखेपासून ती सेवा धरण्याचा शासननिर्णय निर्गमित झाला पण आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे त्यांची सेवा सन २०१३ पासून धरली जाईल. कायद्याने एकतर्फी अशी कारवाई करता येत नाही, त्यामुळे असे करतांना त्या प्रत्येक शिक्षकाला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुम्ही पी.एचडी. प्राप्त केल्यामुळे तुमची सेवा 'त्या' तारखेपासून स्थाननिश्चितीसाठी ग्राह्य धरण्यात आली होती पण आता ती २०१३ पासून धरावयाचे ठरविले आहे" असे "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉजमध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना निर्णय घ्यावा लागेल.

(७) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या अंदाजे १० हजार शिक्षकांपैकी

***क्रमांक बहिष्कार : २०१३/प्र.क्र.७१/विशि-३***

## *उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,*

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ : दिनांक : ७ मार्च, २०१३.

प्रति,
प्रा. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो,
शिवाई, ३९ रेऊनगर, ढेकू रोड, अमळनेर, जि. जळगांव पिन कोड : ४२५ ४०१
श्री. विक्रम काळे, विधानपरिषद सदस्य

**विषय :** अकृषी विद्यापीठीय शिक्षक व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांचा परीक्षेच्या कामकाजावरील घातलेल्या बहिष्कार मागे घेण्याबाबत.

महोदय,

राज्यातील अकृषी विद्यापीठीय व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांच्या मागण्यांसाठी परीक्षेच्या कामकाजावर दिनांक ४.२.२०१३ पासून बहिष्कार घातलेला आहे. शिक्षकांच्या मागण्यां संदर्भात संघटनेसोबत दिनांक ६.२.२०१३ चर्चा झाली आहे. सदर बैठकीत घेण्यात आलेले निर्णय संघटनेस कळविण्यात आले आहेत. तथापि संघटनेने बहिष्कार मागे घेतलेला नाही. आता संघटनेच्या दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करण्याबाबतच्या मागणीसंदर्भात दिनांक ६.३.२०१३ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**"दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा विर्निदिष्ट अटींच्या अधिन राहून शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे."**

मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण तसेच शिक्षक संघटनेच्या प्रतिनिधींसोबत दिनांक ६.२.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत **थकबाकी पोटी अदा करावयाच्या रकमेच्या अनुषंगाने रु. ५००.०० कोटीचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरीत करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.**

वरील बाबी विचारात आपणास याद्वारे आवाहन करण्यात येते की, राज्यातील उच्च शिक्षण संबंधित विद्यार्थी, पालक यांचे हित विचारात घेऊन व सामाजिक जबाबदारीची जाणीव लक्षात घेऊन परीक्षेच्या कामकाजावर दिनांक ४.२.२०१३ पासून घातलेला बहिष्कार व त्या अनुषंगाने सुरु असलेले आंदोलन तात्काळ मागे घेण्यात यावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
**(रा.गो.जाधव)**

** AF : P05 **

अनेकांनी या काळात **एम.फील. ही पदवी प्राप्त केली.** त्यांची सेवा स्थाननिश्चितीसाठी नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून धरायला हवी होती पण तशी ती धरली नसली तरी एका विशिष्ट तारखेपासून धरण्याचा शासननिर्णय निर्गमित झाला पण आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे त्यांची सेवा सन २०१३ पासून धरली जाईल. कायद्याने एकतर्फी अशी कारवाई करता येत नाही, त्यामुळे असे करतांना त्या प्रत्येक शिक्षकाला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुम्ही एम.फील. ही पदवी प्राप्त केल्यामुळे तुमची सेवा 'त्या' तारखेपासून स्थाननिश्चितीसाठी ग्राह्य धरण्यात आली होती पण आता ती २०१३ पासून धरायचे ठरविले आहे" असे "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉजमध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना निर्णय घ्यावा लागेल.

(८) सेवेत 'कन्फर्म' असलेल्या या अंदाजे १० हजार शिक्षकांपैकी अनेकांनी या काळात **नेटसेटची पात्रता प्राप्त केली.** त्यांची सेवा स्थाननिश्चितीसाठी नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून धरायला हवी होती पण तशी ती धरली नसली तरी पुढच्या एका विशिष्ट तारखेपासून धरण्याचा शासननिर्णय निर्गमित झाला पण आता या नव्या व्याघाती शासननिर्णयाप्रमाणे त्यांची सेवा सन २०१३ पासून धरली जाईल. कायद्याने एकतर्फी अशी कारवाई करता येत नाही त्यामुळे असे करतांना त्या प्रत्येक शिक्षकाला "शो कॉज" नोटीस द्यावी लागेल. "तुम्ही नेटसेटची पात्रता प्राप्त केल्यामुळे तुमची सेवा 'त्या' तारखेपासून स्थाननिश्चितीसाठी ग्राह्य धरण्यात आली होती पण आता ती २०१३ पासून धरायचे ठरविले आहे" असे "वरवर 'शो' करण्यापुरते कां होईना पण सन २०१३ च्या शासनाच्या या व्याघाती निर्णयाचे 'कॉज' शो कॉजमध्ये" दाखवावे लागेल. त्यावर त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व नंतरच कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकरणी ज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असेल त्यांना निर्णय घ्यावा लागेल.

(९) अस्तित्वात असलेल्या तीन शासननिर्णयाच्या (११ डिसेंबर १९९९, ६ मार्च १९९९ व १५ फेब्रुवारी २०११) आधारे नेटसेट नसलेल्या १९९१ ते २००० या काळात नेमणूका झालेल्या शेकडो नेटसेट मुक्त शिक्षकांची (एम्.फील पीएचडी नसलेल्या) सेवा नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून धरून ११.१२.१९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात आली व त्याप्रमाणे त्यांना आज प्रत्यक्षात वेतन मिळत आहे. **अशा शिक्षकांची संख्या महाराष्ट्रात दोन ते तीन हजार आहे.**

नियमाप्रमाणे सहसंचालकांनी कारवाई केली असली तरी ती करतांना आपल्याला विचारले नाही म्हणून मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांना राग आला व त्यांनी "ते रद्द करा" असे तोंडी आदेश दिले. पुण्याच्या सहसंचालकांनी तसे लेखी आदेश पारित केले. डझनावरी शिक्षकांना न्यायालयात जावे लागले. दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजी मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणात निर्णय दिला. त्या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये असे नमुद आहे की :- "It is also

# महाराष्ट्र शासन

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय : महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली

दूरध्वनी - ०११-२३३६३७७३, २३३६७८३० फॅक्स २३७४२१५५ E-Mail - micnewdelhi@gmail.com

## वृत्त विशेष : दि. १ एप्रिल २०१३

## प्राध्यापकांच्या थकबाकी वेतनाचा गुंता पवार - पल्लमराजू यांच्या बैठकीत सुटला

### १५०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय

नवी दिल्ली, दि. १ एप्रिल : गेल्या दोन महिन्यांपासून महाराष्ट्रात सुरू असलेल्या प्राध्यापकांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्. पल्लमराजू यांनी सोमवारी ६ व्या वेतन आयोगातील थकबाकीसाठी केंद्राचा ८० टक्के वाटा तातडीने देण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार १५०० कोटी रुपये केंद्रातर्फे दिले जाणार आहेत. केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी राज्यातील हा गुंता सोडविण्यासाठी त्यांना आपल्या ६ जनपथ या निवासस्थानी निमंत्रित केले होते. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेत संप मागे घ्यावा, असे आवाहनही उभय नेत्यांनी केले.

महाराष्ट्रात गेला ५६ दिवसांपासून प्राध्यापकांचा संप सुरू आहे. प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये ६ व्या वेतन आयोगानुसार मिळणारी थकबाकी देण्यात यावी आणि बिगर नेट सेट अध्यापकांना त्यांच्या नियुक्ती पासून सेवाशर्ती देण्यात याव्यात याचा समावेश आहे. यापैकी पहिल्या मागणीवर **केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्.पल्लमराजू यांनी स्पष्ट केले की, केंद्र शासन राज्य शासनाला एकूण वेतन रकमेतील १५०० कोटीचा मोबदला देण्यास तयार आहे. महाराष्ट्र शासनाने निधी मंजूर केल्याबरोबर १५०० कोटीची अर्थात ८० टक्के केंद्राची मदत जारी केली जाईल.** कृषीमंत्री शरद पवार यांनी यावेळी बोलताना, राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याने थकबाकीसाठी सध्या ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे आपणास कळविले असल्याचे सांगितले. राज्य शासनाच्या वतीने ही माहिती मनुष्यबळ विकास मंत्र्यांना आपण दिली असल्याचेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. त्यामुळे राज्य शासनाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. केंद्रही मोबदल्याची रक्कम राज्याला देणार आहे. त्यामुळे प्राध्यापकांच्या थकबाकीचा महत्त्वाचा गुंता निकाली निघाला आहे. महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे हित नेहमीच जोपासले असून या निर्णयानंतर ते संप मागे घेतील, अशी आपणास खात्री असल्याचे बैठकी नंतर सांगितले.

पल्लमराजू यांनी देखील केंद्र शासनाला विद्यार्थी आणि प्राध्यापक या दोघांच्या हिताची जाणीव असून थकीत वेतनाचा गुंता श्री. पवार यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर निकाली निघाल्याचे सांगितले. **प्राध्यापकांसाठी नेटसेट पात्रता हा विषय संवेदनशील असून अधिकारीस्तरावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करू असेही पल्लमराजू यांनी सांगितले.** राज्यातर्फे उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव संजय कुमार, तर मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव अशोक ठाकूर बैठकीत सहभागी होते.

**सूचना :** सोबत फोटो जोडला आहे.

केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार आणि केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्. पल्लम राजू राज्यातील प्राध्यापकांच्या संपाबाबत चर्चा करतांना

** AF : P07 **

**सन २०१३ मध्ये निघणारा शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सेवा धरावयाची असा जो निर्णय झाला आहे त्याप्रमाणे "दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२०००" या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांची सेवा कशी काय धरली जाईल?**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ३.२ पहा*

common ground that their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier. They were also paid in the senior scale and the selection grade as per the Government Resolution dated 11th December, 1999. It is also an admitted position that now by the orders which are impugned in these petitions, the Joint Director, Higher Education has cancelled the order made by him earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade. " या शिक्षकांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती रद्द करणारे सहसंचालकांचे आदेश मा. उच्च न्यायालयाने पुढील शब्दात रद्द ठरविले. :-

"The orders impugned in the petitions, whereby the orders made earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade have been cancelled, are set aside"

पुणे विभागासारखाच प्रकार औरंगाबाद विभागातसुद्धा घडला. शेकडो शिक्षकांना न्यायालयात जावे लागले व डझनावरी प्रकरणे मा. उच्च न्यायालयासमोर दाखल झालीत. WRIT PETITION NO. 1991 OF 2011" या प्रकरणामध्ये मा. औरंगाबाद खंडपिठाने दिनाक २८ मार्च २०११ रोजी निर्णय दिला व सहसंचालकांचे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती रद्द करणारे आदेश रद्द केले. **पुढे अशा अनेक प्रकरणात एकामागून एक न्यायालयातून निर्णय झालेत.**

**५.** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने ७ मार्च २०१३ च्या पत्रान्वये नेटसेटबाबत कळविलेल्या निर्णयांतर्गत येणाऱ्या शिक्षकांची संख्या २८७७ सांगितली जाते. हे 'सफेद झुट' आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व राज्य शासनाच्या निर्णयाने प्रभावित झालेल्या व होणाऱ्या अशा शिक्षकांची संख्या १० हजार असल्याची अधिकृत माहिती संघटनेजवळ आहे. कोणतेही वाजवी कारण नसतांना त्यांचे राज्य शासनातील अधिकाऱ्यांनी पाच प्रकार केलेले आहेत. (१) आयोगाने 'एक्झमशन' दिल्यामुळे ज्या बिगर नेटसेट शिक्षकांना नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सर्व लाभ मिळालेले आहेत व त्यांचे लाभ काढून घेण्याचा प्रयत्न मा. उच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला अशा शिक्षकांची संख्या २ हजाराच्यावर आहे. (२) दुसरा प्रकार पी.एचडी. झालेले (३) तिसरा प्रकार एम्.फील. झालेले (४) चौथा प्रकार नेटसेट झालेले व (५) पाचवा प्रकार इतर. या शिक्षकांची अशी वर्गवारी करण्याचे कोणतेही वाजवी कारण नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने तशी वर्गवारी केलेली नसून पूर्वी केलेले अनेक प्रकार बाजूला सारुन सर्वांसाठी एकाच प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. राज्य शासनातील अधिकारी सांगत असलेली आकडेवारी ही मुद्दामहून दिशाभूल करणारी आहे व कदाचित ते फक्त पाचव्या प्रकाराविषयी बोलत असावेत. **राज्यशासनाने घेतलेल्या निर्णयामुळे उपरोक्त ५ पैकी पहिला प्रकार सोडला तर इतर चारही प्रकार भरडले जाणार आहेत ही गोष्ट लपविण्याचा अधिकारी प्रयत्न करीत आहेत.**

**६.** दंडशक्तीचा विधिमय वापर करण्याचा एकाधिकार ज्या शासनाला कायद्यानेच बहाल केलेला आहे त्या शासनाने शिक्षक कर्मचाऱ्यांचे आंदोलन किंवा कोणतेही आंदोलन मोडून काढण्यासाठी फसवणूक आणि विश्वासघात या मार्गाचा वापर करण्याचा निर्णय घेतला असेल तर लोकशाही व्यवस्थेमध्ये ती गोष्ट अत्यंत निकृष्ट व टाकावू समजल्या गेली पाहिजे. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक २ मे २०१२ रोजीच्या बैठकीमध्ये जे लेखी आश्वासन दिले व ज्याच्या आधारावर या महासंघाने त्यावेळी एकतर्फी आंदोलन मागे घेतले त्या लिखीत आश्वासनाची अम्मलबजावणी न होण्यामुळे आपली फसवणूक व विश्वासघात झाल्याची तीव्र भावना उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये आज पसरली आहे. **दमनशक्तीच्या आधारावर फसवणुकीच्या व विश्वासघाताच्या या कार्यक्रमाला यशस्वी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला ठामपणे व निर्धारपूर्वक विरोध करण्याचा निर्णय महासंघाचे हे कार्यकारी मंडळ घेत आहे.**

**(प्रा.शिवाजीराव पाटील)** — *अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**कालगणनेमध्ये एखादा शासननिर्णय काढून सन १९९१ ते २००० चा कालखंड हा सन २०१३ नंतर आणून उभा करता येईल काय? व त्याप्रमाणे सेवा नियमित केल्याची गणना कशी करता येईल? परस्पराच्या विरुद्ध असलेली ही दोन वाक्ये शासननिर्णयात एकमेकाला खेटून बसल्याने कालगणनेचे चक्र उलटे कसे फिरवीता येईल?**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ३.२ पहा*

**दंडशक्तीचा विधिमय वापर करण्याचा एकाधिकार ज्या शासनाला कायद्यानेच बहाल केलेला आहे त्या शासनाने शिक्षक कर्मचाऱ्यांचे आंदोलन किंवा कोणतेही आंदोलन मोडून काढण्यासाठी फसवणूक आणि विश्वासघात या मार्गाचा वापर करण्याचा निर्णय घेतला असेल तर लोकशाही व्यवस्थेमध्ये ती गोष्ट अत्यंत निकृष्ट व टाकावू समजल्या गेली पाहिजे.**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ६ पहा*

# वृत्तपत्रामध्ये निराधार बातम्या सोडण्याचा शासनाचा सपाटा

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव पाटील यांचा खुलासा**

*'नुटा'चे अध्यक्ष डॉ. प्रविण रघुवंशी यांचे निवेदन*

अमरावती दिनांक ८ एप्रिल २०१३ : अमरावती येथे काही वृत्तपत्र कार्यालयातील मित्रांमार्फत महाराष्ट्र शासनाच्या जनसंपर्क कार्यालयाद्वारे आज प्रसारित करण्यात आलेले वृत्तपत्रीय प्रसारण "वृत्त विशेष ५२१ दिनांक ८ एप्रिल २०१३" हे प्राप्त झाले. ते वृत्त शब्दशः जसे च्या तसे याच अंकात प्रसृत केलेले आहे. सदरहू वृत्तविशेषाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष मा. प्रा. श्री. शिवाजीराव पाटील यांचेशी संपर्क केला असता त्यांनी याबाबत पुढील प्रमाणे खुलासा केला. :-

**२.** "सदरहू विशेषवृत्त क्रमांक ५२१ ची अधिकृत मूळ प्रत मलाही वृत्तपत्राच्या कार्यालयातूनच प्राप्त झाली असून तीचे काळजीपूर्वक वाचन केल्यानंतर स्पष्टपणे काही बाबी नमूद करणे मला आवश्यक वाटते. (१) केंद्र शासनाची ८० टक्के मदत मिळवावयाची असेल तर ही थकबाकीची रक्कम राज्य शासनाला एकमुस्त व एकरकमी प्रथम अदा करावी लागेल व नंतरच केंद्राकडून परतावा मिळेल ही गोष्ट उच्च शिक्षण विभागाला समजलेली आहे असे दिसून येते. पण या वृत्तातील "ही संपूर्ण रक्कम एकाचवेळी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे." हे वाक्य वाचल्यांतर अजूनही त्यांचा प्रयत्नच चालू आहे अशी माहिती या बातमीतून उपलब्ध होते हे दुर्दैवी आहे. (२) सन १९९१ ते २००० या काळात सेवेत आलेल्या सर्व बिगर नेटसेट अध्यापकाबद्दल मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अधिकृत माहिती महासंघाजवळ उपलब्ध आहे. त्यापेक्षा वेगळीच माहिती या वृत्तपत्रीय प्रसारणामध्ये दिलेली आहे. मूळ निर्णयात त्यांचे दोन भाग केल्याचा उल्लेख कोठेही नाही. (३) विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत "होणारा विपरीत परिणाम विचारात घेऊन पुढील दोन प्रस्ताव यथावकाश मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहेत." असा उल्लेख या वृत्तविशेषामध्ये आहे. ठेवण्यात येणार असलेले प्रस्ताव यापूर्वी देण्यात आलेल्या लेखी आश्वासनाची पूर्तता करणारे नाहीत हे कोणाच्याही चटकन लक्षात येईल. विद्यार्थी व शिक्षकांच्या हिताविषयी अत्यंत बेपर्वाई दाखविणारे या पत्रकातील "पुढील दोन प्रस्ताव यथावकाश मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहेत." हे उद्‌गार संवेदन हिनतेचा परिचय देणारे आहे. (४) मा. मुख्य सचिव,मा. उच्च शिक्षण मंत्री व मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या लेखी आश्वासनांची पूर्तता करण्याची कोणतीही तयारी उच्च शिक्षण विभागात पूर्ण झालेली नाही हे यावरून स्पष्ट झालेले आहे.

**३.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांचा उपरोक्त चार मुद्यांचा खुलासा जसाच्या तसा प्रकाशित करण्यात येत आहे.

**डॉ. प्रविण रघुवंशी**
अध्यक्ष 'नुटा'

***या सर्व शिक्षकांची सेवा १२ ते २१ वर्षे झालेली असून त्यांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी साठी सेवा धरण्याचा एक लाभ सोडला तर इतर सर्व लाभ नेमणुकीच्या दिनांकापासून आज अस्तित्वात असलेल्या कायद्याने, परिनियमांनी व शासननिर्णयांनी उपलब्ध झालेले आहेत व मिळत आहेत. वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी सुद्धा त्यांची सेवा धरली जावी असे केंद्र शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय व खुद्द महाराष्ट्र शासनाचे जिवंत शासननिर्णय असतांना महाराष्ट्रातच फक्त ही सेवा धरली जात नाही. याबद्दल आंदोलन सुरू असतांना सर्व प्रयोजनासाठी त्यांची सेवा 'उद्या'पासून धरण्याची जी शब्दरचना नोकरशाहीने रचित केली आहे, ती अचंबित करणारी आहे.***

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ३.४ पहा*

**दमनशक्तीच्या आधारावर फसवणुकीच्या व विश्वासघाताच्या या कार्यक्रमाला यशस्वी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला ठामपणे व निर्धारपूर्वक विरोध करण्याचा निर्णय महासंघाचे हे कार्यकारी मंडळ घेत आहे.**

*महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ६ पहा*

# महाराष्ट्र शासन

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय : मंत्रालय, मुंबई

***१८ चैत्र, १९३५ (सायं. ५.३० वा) : वृत्त विशेष ५२१ : दि. ८ एप्रिल २०१३***

## सहावा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम महाविद्यालयीन शिक्षकांना मे अखेर देणार

मुंबई, दि. ८ : राज्यातील अकृषी व संलग्नित महाविद्यालयातील (कायम स्वरुपी विनाअनुदानित महाविद्यालये वगळून) तसेच अनुदानित अभिमत विद्यापीठातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर वेतन श्रेणीतील फरकापोटी आतापर्यंत ३१८.७५ कोटी रुपये देण्यात आले असून बाकी असलेले १२०९.९३ कोटी रुपये देण्यासाठी **५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.** तर उर्वरित ७०९.९३ कोटी रुपये इतकी रक्कम मे, २०१३ अखेर देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. **तसेच ही संपूर्ण रक्कम एकाचवेळी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.**

सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील देय असलेल्या वेतनापोटी अतिरिक्त खर्चाची एकूण रक्कम १९१०.८० कोटी रुपये इतकी आहे. या फरकाच्या रकमेपैकी ८० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून उपलब्ध होणार व २० टक्के रक्कम राज्य शासन देणार आहे.

दिनांक १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २००९ या कालावधीतील राज्य शासनाच्या हिश्श्याची २० टक्के रक्कम संबंधित शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा होणाऱ्या ५ हप्त्यांपैकी मार्च २०१३ पर्यंत **देय असलेले चार हप्ते देण्यात आले आहेत.** दिनांक १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील राज्य शासनाच्या हिश्श्याची (२० टक्के) ११४.५३ कोटी रुपये द्यावयाच्या रकमेपैकी ११४.२८ कोटी रुपये **एवढी रक्कम देण्यात आलेली आहे.**

केंद्र सरकारच्या बदललेल्या भूमिकेप्रमाणे आता ८० टक्के प्रमाणे फरकाची रक्कम १५२८.८० **कोटी रुपये राज्य शासन प्रथम देणार असून केंद्र शासनाकडून प्रतिपूर्ती मागण्यात येणार आहे.**

दिनांक १९ सप्टेंबर१९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत ५१६० बिगर नेटसेट अध्यापकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी २२८३ अध्यापकांनी दरम्यानच्या कालावधीत **विहित शैक्षणिक अर्हता** प्राप्त केली असून उर्वरित २८७७ अध्यापकांनी अद्याप शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली नाही. अशा अध्यापकांची सेवा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ग्राह्य धरून त्यांना अनुषंगिक लाभ देण्यात यावे, त्याचप्रमाणे त्यांना नवीन परिभाषिक अंशदायी सेवानिवृत्ती योजना लागू करण्यात यावी असा निर्णय दिनांक ६ मार्च २०१३ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. या अध्यापकांनी दरम्यानच्या काळात शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे. **त्यांची सेवा त्या दिनांकापासून ग्राह्य धरून त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.**

संघटनांना हे निर्णय कळवूनही काही शिक्षकांनी परीक्षा कामकाजावरील बहिष्कार सुरू ठेवला असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर होणारा विपरीत परिणाम विचारात घेऊन **पुढील दोन प्रस्ताव यथावकाश मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहेत.**

"बिगर नेटसेट अध्यापकांनी विहित शैक्षणिक अर्हता दरम्यानच्या कालावधीत प्राप्त केली असल्यास त्यांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून काल्पनिकरित्या (नोशनल) ग्राह्य धरून त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करणे, तसेच ज्या अध्यापकांनी अद्यापही विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली नाही अशा अध्यापकांना अर्हता प्राप्त करण्यासाठी पुढील तीन वर्षांची संधी देऊन, या कालावधीत ते ज्या दिनांकास अर्हता प्राप्त करतील त्या दिनांकास त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून काल्पनिकरित्या (नोशनल) सेवा ग्राह्य धरून त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करणे."

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **15.04.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

--------------------------------------------------

To,............................................................

...............................................................

...............................................................

...............................................................

...............................................................